विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. ( नांदेड जिल्हयातील सर्व पेट्रोलपंप जमावबंदीच्या/संचार बंदीच्या अटी व शर्तीनुसार चालु ठेवणेबाबत. )

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१ /कोरोना/सीआर-

दि. २३/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

४) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक २२.०३.२०२०.

५) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २३.०३.२०२०

**सुधारीत आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्या अधिकाराचा वापर करुन, नांदेड जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नांदेड जिल्हयातील सर्व पेट्रोलपंप दि.२३ मार्च, २०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपासून ते दिनांक ३१.०३.२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत सर्व जनतेसाठी संदर्भ क्र.५ वरील आदेशाव्दारे बंद ठेवण्याचे आदेशित करण्यात आले होते.

तथापि याव्दारे वरील आदेशात अंशतः बदल करुन या कार्यालयाचे संदर्भ क्र.४ वरील जमावबंदी आदेश व संचारबंदीच्या अटी, शर्ती व निर्देशाचे अधिन राहून सर्व पेट्रोलपंप चालू ठेवण्याची याव्दारे अनुमती देण्यात येत आहे.

सदर आदेशाचे अंमलबजावणी जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड व पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी त्यांचे अधिनस्त यंत्रणेमार्फत करुन तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

तसेच, सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित पेट्रोलपंप धारका विरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार व इतर अनुषंगीक कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
२) पोलीस अधीक्षक, नांदेड
३) जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड
४) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
५) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत जि.नांदेड
७) सेल्स ऑफीसर,BPCL/HPCL/IOCL/ESSAR/NAYARA जि नांदेड यांना अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**